# लपंडाव

दूर क्षितिजापासून सुरू झालेल्या  सागर
त्यावर आसमंतातून हवेने आणली लहर

तिचा पाठलाग करत होती माझी नजर
पण माझ्या कडे येताना तिने केला कहर

हवेच्या झोक्यावर स्वतःला हरवून बसली
तिच्या सवे दृष्टि माझी लाटेत गायब झाली

यामुळे जीव माझा खूप कासावीस झाला
क्षणार्धात जीवनाचा कागद कोरा  दिसला

लहरींनी हळुवारपणे  पावलांना दिली जाणीव
मग आनंदाने चेहऱ्यावर हास्य आले उमलून